# अदाणी इलेक्ट्रिसिटीचे सिलिंग फॅन उपलब्ध

**मुंबई** – गेल्या वर्षी ऊर्जा बचत करणारा सिलिंग फॅनला ग्राहकांनी पसंती दिल्यानंतर एईएमएलने यंदा निवासी ग्राहकांसाठी सिलिंग फॅन उपलब्ध केले आहेत. हे सिलिंग पंखे सरासरीपेक्षा ६० टक्के कमी विजेचा वापर करतात. गेल्या तीन उपक्रमांदरम्यान अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.ने त्यांच्या निवासी ग्राहकांना अनुदानित खर्चामध्ये २५ हजार ऊर्जा कार्यक्षम ५ स्टार सिलिंग पंखे व ६५०० रेफ्रिजरेटर्सचे वितरण केले होते. यंदा कंपनी ५० हजारांहून अधिक सिलिंग पंख्यांसह ऊर्जा बचत करणाऱ्या उपकरणांची किंमत अधिक असल्यामुळे एईएमएलने खरेदीवर २५ ते ३० टक्क्यांची रिबेट देण्याचा निर्णय घेतला आहे.